# महात्मा फुले कृषी विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा

## कृषी हवामानशास्त्र विभाग

विभाग प्रमुख : डॉ. ज. दा. जाधव

कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२५५३८००९


## सोलापूर

दिनांक: १२.०३.२०१९

### हवामान अंदाज :

| Solapur | Rain | Tmax | Tmin | CC | RH-I | RH-II | WS | WD |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13.03.2019 | 0 | 39 | 22 | 2 | 24 | 14 | 17 | 336 |
| 14.03.2019 | 0 | 39 | 22 | 1 | 22 | 13 | 13 | 73 |
| 15.03.2019 | 0 | 39 | 23 | 0 | 21 | 13 | 16 | 51 |
| 16.03.2019 | 0 | 40 | 23 | 1 | 26 | 12 | 11 | 209 |
| 17.03.2019 | 0 | 39 | 23 | 1 | 30 | 13 | 11 | 251 |

### हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्हयात पुढील ५ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. काढणीस आलेल्या रब्बी पिकांची काढणी करावी तसेच काढणी केलेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षित ठिकाणी ठेवावे. आवश्यक तेथे रब्बी पिके, भाजीपाला व फळबागांना गरजेनुसार पाणी द्यावे. एक वर्षाचे आतील नवीन लागवड केलेल्या फळपिकांचे (कलमे/रोपे) कडक उन्हापासून संरक्षणासाठी सावली करावी तसेच खोडाभोवती पाला पाचोळ्याचे आच्छादन करावे.

| पिक | पिक अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| गहू | काढणी | पक्वतेकडे आलेल्या गव्हाची काढणी व मळणी करावी. समाधान या गव्हाच्या वाणाची २-३ दिवस अगोदरच सकाळीच काढणी करावी म्हणजे दाणे गळणार नाहीत. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा फिप्रोनिल २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच भाजीपाला पिकावरील कोळीच्या नियंत्रणासाठी फेनप्रोपॅथ्रीन ३०% ई.सी., ५ मिली किंवा डायकोफॉल १८.५% ई.सी., २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| टरबुज/ काकडी वर्गीय वेल पिके | पिक वाढीची अवस्था | टरबुज आणि काकडी वर्गीय वेल पिकांमध्ये खालच्या पानांमध्ये नाग अळीचा प्रादुर्भाव दिसुन येताच ४ % निबोंळी अर्काची फवारणी करावी तसेच फळमाशीच्या नियंत्रणासाठी क्युलुरची एकरी ५ कामगंध सापळे लावावेत. दर ३ आठवड्यांनी लुर ची वडी बदलावी. |
| ऊस | पिक वाढीची अवस्था | ऊस काढल्यानंतर हुमणीच्या नियंत्रणासाठी खोल नांगरट करावी. हुमणीच्या नियंत्रणासाठी परोपजीवी बुरशी मेटॅरायझीम ॲनसोपली हेक्टरी ५ किलो शेणखतातून द्यावे. |
| आंबा | मोहर अवस्था | आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस एल ३ मिली + सल्फर ८० % डब्ल्यू पी २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच फळगळ कमी करणेसाठी २० पी.पी.एम (१ ग्रॅम प्रति ५० लिटर पाणी) नॅप्थॉलिक ॲसेटिक ॲसिड ( NAA) संजिवकाचे द्रावण मोहोरावर फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | उन्हाळी हंगामात जनावराना ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका तसेच चवळी आणि संकरित नेपिअर या चारा पिकांची लागवड करावी. उसाचे वाढे जनावरांना जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. खाऊ घालावयाचे असल्यास प्रति दिन एका जनावरास केवळ ८ किलो वाढे आणि त्यासोबत सकस द्विदल वर्गातील हिरवा चारा, गरजेनुसार वाळलेला चारा व आंबवण तसेच २५ ते ३० ग्रम क्षार मिश्रण देणे अत्यंत गरजेचे |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. सध्या तापमानातील वाढ लक्षात घेता जनावरांना शक्यतो सावलीची व्यवस्था करावी. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |